**महावितरण** (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन उपक्रम)
**सीआयएन : यु४०१०९एमएच२००५एसजीसी१५३६४५**

दुरध्वनी क्र. २६४७४७५३ (वै)/२६४७४२११ (का)
फॅक्स क्र. २६४७२३६६
ईमेल : cecomm@mahadiscom.in
संकेतस्थळ : www.mahadiscom.in

प्लॉट क्र. जी-९, प्रकाशगड
प्रो. अनंत कान्हेकर मार्ग,
वांद्रे (पूर्व)
मुंबई- ४०० ०५१

**पत्र क्र. पी-कॉम/** No 13714 **दिनांक:** 16 MAY 2016

**वाणिज्य परिपत्रक क्र.** २६४

**विषय:** वीज चोरी प्रकरणातील ग्राहकांच्या वीज कायदा-२००३ कलम १३५ अन्वये घडलेल्या गुन्ह्यांच्या तडजोड अर्जाबाबत मार्गदर्शक सूचना (तत्वे).

वीज चोरीची प्रकरणे हाताळतांना असे निदर्शनास आले आहे की, अनेक ठिकाणी ग्राहकांकडून घडलेला गुन्हा हा वीज चोरी करण्यात तांत्रिकदृष्ट्या सक्षम, व्यावसायिक व्यक्तिमार्फत वीज बिल कमी करुन देण्याच्या प्रलोभनाला बळी पडून घडलेला गुन्हा असतो. काही तांत्रिक जाणकारांमुळे व त्यांच्या कृत्यामुळे वितरण कंपन्यांना अतोनात नुकसान होत आहे.

वीज चोरीचा कलम १३५ अन्वये प्रथम गुन्हा असल्यास, तो तडजोडीस पात्र असून त्याचे अधिकार वितरण परवानेधारक कंपन्यांच्या अधिकाऱ्यांना राज्य शासनाने दिलेले आहेत. यामध्ये पहिल्यांदा गुन्हा करणाऱ्यास, गुन्हा कबूल असल्यास, हा गुन्हा निदर्शनास आणून देऊन तडजोडीच्या पर्यायाची एक संधी दिलेली आहे.

तसेच कलम १३८ अन्वये वितरण परवानेधारकाच्या मीटरमध्ये अथवा कामामध्ये हस्तक्षेप केल्यास घडणारा गुन्हा हा तडजोडीस पात्र नाही.

यावरुन असे सूचित होते की, मीटरमध्ये फेरफार करण्याच्या व्यवसायात गुंतलेल्या तांत्रिक मदतनीसाबाबत तडजोडीची कोणतीही तरतूद कायदयात नाही, कारण तांत्रिक मदतनीसांची मदत हे वीज चोरीचे मूळ कारण आहे.

कायद्याच्या योग्य अंमलबजावणीसाठी गुन्हा कबूल करण्याची व्याप्ती, ग्राहकाने वीज चोरी केली आहे, या पुरतीच मर्यादित न ठेवता गुन्हा कधी केला व कोणाच्या तांत्रिक मदतीने केला व पहिल्यांदा केला किंवा कसे याची सुद्धा माहिती ग्राहकाने सोबत जोडलेल्या लेखी प्रस्तावात नमूद करणे आवश्यक आहे.

सदर अर्ज हा राज्य शासनाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यासमोर करावयाचा असल्याने तो अर्ज म्हणजे शासनासमोर दिलेला कबूलनामा व तडजोड अर्ज असे गृहित धरले जाईल व तांत्रिक मदतनीसाच्या विरोधात कलम १३८ अन्वये कारवाई प्रस्तावित करुन, प्रथम गुन्हा असल्यास ग्राहकाची तडजोड विनंती मान्य करता येईल.

जर तांत्रिक मदतनीस हा महावितरण कंपनीत कार्यरत कर्मचारी असेल आणि त्यांनी वीज चोरीस मदत केल्याचा सबळ पुरावा असल्यास सदर कर्मचारी प्रचलित सेवाविनियम तसेच विद्युत कायदा-२००३ अन्वये कारवाईस पात्र राहिल.

**मुख्य अभियंता (वाणिज्य)**

**प्रत रवाना :** प्रेषण यादीप्रमाणे.

# लेखी प्रस्ताव

**प्रति,**
**उपकार्यकारी अभियंता/अतिरिक्त कार्यकारी/अधिक्षक अभियंता,**
**उपविभाग/फिरते पथक/मडळ,**
**महावितरण, ____________.**

**विषयः विजचोरी प्रकरणातील विद्युत कायदा २००३, कलम-१३५ अन्वये वीज चोरी गुन्हे प्रकरणी तडजोडीबाबत.**

महोदय,

मी ________________________________________ याद्वारे जाहीर करतो की, विजचोरी प्रकरणातील विद्युत कायदा -२००३, कलम-१३५ अन्वये माझ्या अखत्यारित असलेल्या विद्युत जोडणी क्र. ____________ तपासणी केली असता त्या ठिकाणी विज चोरी होत असल्याचे आढळून आले व ते मला मान्य आहे. सदर वीज चोरीच्या गुन्हे प्रकरणी तडजोड करण्यास मी तयार आहे.

सदर प्रकरणात तडजोड करावयाची माझी विनंती आहे. मी असे जाहिर करतो की,

अ) सदर वीज चोरीचा गुन्हा हा पहिला आहे/नाही.

ब) सदर वीज चोरी साठी मला ______________________ यांनी तांत्रिक मदत / इतर केली आहे/होती.

क) तांत्रिक मदत केलेल्या व्यक्तिचा तपशिलः

नावः______________________________________________ वयः __________

पत्ताः________________________________मोबइल नं.___________________________

इतर माहितीः ________________________________________________________

________________________________________________________

ड) सदर वीज चोरी __________________________ पासून केली आहे.

ई) इतर माहिती ________________________________________________________

________________________________________________________

उपरोक्त माहिती ही मी, स्वइच्छेने, कुठल्याही दबावास बळी न पडता सादर करीत असून ती सत्य आहे.

तरी वीज चोरी गुन्हे प्रकरणी निर्धारण रक्कम रु.______________ तसेच तडजोडची विनंती स्विकारुन माझ्या गुन्ह्याची तडजोड करावी.

**आपला**

**सही __________**
**ग्राहकाचे नांव :-**
**ग्राहक क्र.**

सक्षम अधिका-याचा निर्णयः- ------------